सं. फौ. प्र. क्र. – ९०६/२०२२
सरकार वि. आकाश
**निशाणी क्र. ५२**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा शपथेवर जबाब</u>**

**<u>सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

**माझे नाव** – नितीन नारायणसिंग गौर,
**वय** – ५५ वर्ष, धंदा – मजुरी,
**राहणार** – बाजार चौक, पुसला, ता.–वरुड, जि.अमरावती

---

**<u>सरकारतर्फे सरतपास श्री. एम. ए. यावले, सरकारी वकीलांतर्फे</u>**

**१.** मी पुसला येथे राहतो. दिनांक २०/०२/२०२२ रोजी दुपारी १२.०० ते १२.३० चे सुमारास आकाश याने फोन करुन माझा मुलगा हितेश गौर यांचा अपघात झाल्याचे मला सांगीतले. माइया मुला सोबत एक मुलगा होता. ते शेतात जात होते. माइया मुलाला गावातील लोकांनी दवाखाण्यात आणले होते. ते मोटर सायकलने जात होते. आम्ही गेल्यानंतर डॉक्टरांनी अमरावती किंवा नागपुर येथे नेण्यास सांगीतले. त्याच्या पायावर तीन ठिकाणी तसेच गालावर मार लागला होता. सोबत असलेल्या मुलाला मांडीला फ्रॅक्चर झाले होते. त्यानंतर आम्ही त्याला वरुड येथील राऊत यांच्या दवाखाण्यात नेले होते. गावातील लोकांनी आम्हाला सांगीतले की, एका चारचाकी गाडीने अपघात झाला होता. गाडीचा क्रमांक मला माहीत नाही. मी आरोपीला पाहीले नाही. आरोपी आज न्यायालयात हजर आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. आता मला रिपोर्ट दाखविला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.५३</u>** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.५४</u>** देण्यात येते. घटना अंदाजे तीन वर्षांपुर्वी घडली होती.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. जे. पी. सोनारे विधीज्ञ</u>**

२. मी अपघात झालेला प्रत्यक्ष पाहीला नाही. वरुड ते पुसला हे अंतर १० कि.मी. चे आहे. मी माइया मुलाला दवाखाण्यात भरती केल्यानंतर पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मोटर सायकलचा विमा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माइया मुलाला मोटर अपघात प्राधीकरण यांचे मार्फत

नुकसान भरपाई मिळाली आहे. अपघात माझ्या मुलाच्या चुकी मुळे झाला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोटर सायकलला वाहनाने धडक दिली होती व अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की, मुलाला नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – पुर्ण**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्विकृत

THAKARE ISHWAR JAMSING

Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING
Location: CJJD & JMFC, WARUD
Date: 2025.07.16 13:38:44 +0530

**(आय. जे. ठाकरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १,वरुड.

दिनांक : १६/०७/२०२५

सं. फौ. प्र. क्र. – ९०६/२०२२
सरकार वि. आकाश
**निशाणी क्र. ५५**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा शपथेवर जबाब**

**सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव** – निकेश नितीन गौर,
**वय** – २८ वर्ष, धंदा – शेती,
**राहणार** – बाजार चौक, पुसला, ता.–वरुड, जि.अमरावती

---

**सरकारतर्फे सरतपास श्री. एम. ए. यावले, सरकारी वकीलांतर्फे**

१. दिनांक २०/०२/२०२२ रोजी मी दुपारी १२.३० वाजताचे दरम्यान माझा मित्र प्रेमनाथ सह शेतात जात होतो. तेव्हा आमच्या मोटर सायकलला ठोस दिली होती. तो भरधाव वेगाने आला व त्याने आम्हाला धडक दिली. त्या गाडीचा क्रमांक एम.एच.–३१/पी.आर.–२७४७ असा होता. त्यामुळे माझा पाय फ्रॅक्चर झाला होता तसेच मला पाठीवर मार लागला होता. माझ्या सोबत असलेल्या मित्राचा देखील पाय फ्रॅक्चर झाला होता व त्याच्या पाठीला मार लागला होता. त्यानंतर आम्हाला पुसला येथील दवाखाण्यात नेले होते. त्यानंतर वरुड येथील दवाखाण्यात नेले. पुढील उपचाराकरीता अमरावती येथे नेले होते. गाडी कोण चालवित होता हे मला सांगता येणार नाही कारण मी बेशुध्द पडलो होतो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री. जे. पी. सोनारे विधीज्ञ**

२. वरुड ते पुसला रोडवर पुष्कळ वळणे आहेत. आमचे सोबत थ्रेशर मशीनच्या वायरचा बंडल होता. तो बंडल माझ्या व माझ्या मित्राच्या मधात होता. हे म्हणणे खरे नाही की, तो बंडल माझ्या पाठीला घासले म्हणुन माझे गाडीवरचे नियत्रंण सुटले. पुसला ते मोवाड रोडवर कॉर्नर जवळ विरुध्द दिशेन येणा–या मारोती झेन या चारचाकीच्या उजव्या बाजुच्या चालकाच्या गेटवर येवुन धडकली. त्यामुळे मी रोडवर पडलो. हे म्हणणे खरे नाही की, गाडी चालकाने माझी विचारपुस केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याने एक पिकअप व्हॅन थांबवुन आम्हाला रवाना सुध्दा केले होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझ्या चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, एका गाडीने आम्हाला ठोस दिली म्हणुन आम्ही पडलो. हे म्हणणे खरे नाही की,

ती गाडी भरधाव वेगाने येत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला नुकसान भरपाई सुध्दा मिळाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गाडीचा विमा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला नुकसान भरपाई मिळावी म्हणुन माझ्या वडीलांनी खोटा रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – पुर्ण**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्विकृत

**(आय. जे. ठाकरे)**

दिनांक : १६/०७/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १,वरुड.